10 JUN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांचे प्रतिपादन : विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण**

# महामानवांच्या विचारकार्यावर संशोधन व्हावे

**शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तार यासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली.**

**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये कोल्हापूर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधण्यात आलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि उद्घाटन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये शरण अध्यासनाच्या बरोबरीनेच महावीर अध्यासन, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन तसेच अन्य अध्यासन इत्यादी कार्यरत असून त्यांनाही शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी आर्थिक सहकार्य करण्याची भूमिका राहिलेली आहे. शरण साहित्य अध्यासन इमारतीच्या पुढील टप्प्याला गतिमानता देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. महात्मा बसवेश्वरांचे उत्तुंग कार्य आणि प्रेरक विचार यांचा सर्वदूर प्रसार होण्याच्या दृष्टीने सार्वत्रिक प्रयत्नांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार सतेज पाटील यांनी बसवेश्वरांचे विचार जागतिक पातळीवर नेण्यासाठी या अध्यासनाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्यासाठी शासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासनाच्या इमारत लोकार्पण प्रसंगी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, कुलगुरु डॉ. राजनीश कामत, प्र- कुलगुरु डॉ. ज्योती जाधव आदी.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शरण साहित्यामधील समता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील राहील, याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मंत्री आबिटकर आणि मुश्रीफ यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण आणि फीत सोडवून इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सूर्यकांत पाटील–बुध्याळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यश आंबोळे यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, चन्नबसवानंद स्वामीजी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमाकले, रजनीताई मगदूम, डॉ. जी. पी. माळी, सरलाताई पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. सतीश घाळी, चंद्रशेखर डोल्ली, डॉ. विश्वनाथ मगदूम, राजू दड्डी, बसवराज आजरी, राहुल नष्टे, विलास आंबोळे, चंद्रशेखर बटकडली, बाबूराव तारळी, राजशेखर तंबाके, अनिल सोलापुरे, राजेश पाटील–चंदूरकर, सुरेश हुपरे, मल्लाप्पा चौगुले, वास्तुविशारद जीवन बोडके, अभियंता रणजीत यादव यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बसवेश्वरांवर व्यापक संशोधनकार्य व्हावे

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, महात्मा बसवेश्वर हे युगप्रवर्तक क्रांतीकारक होते. नीतीमूल्यांवर चालणारा समाज त्यांना अभिप्रेत होता. त्यासाठी त्यांनी मोठा त्याग केला. त्यांचे जीवनचरित्र आणि कार्य यांच्यावर विद्यापीठात मोठे संशोधनकार्य व्हावे आणि त्याला भरीव सामाजिक पाठबळ लाभावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

10 JUN 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे स्वागत करताना विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील. यावेळी प्र कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि अन्य पदाधिकारी.

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीसाठी विकास आघाडीचे पाठबळ

## • डॉ. संजय डी. पाटील यांची ग्वाही

**जनप्रवास : कसबा बावडा**

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विकासात्मक उपक्रमांना आणि सर्वांगीण प्रगतीसाठी आघाडीतर्फे सहकार्य व पाठबळ देऊ, अशी ग्वाही आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.

अध्यक्ष डॉ. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. कामत आणि डॉ. जाधव यांचे स्वागत केले. विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे. यासाठी आमचे नेहमीच सहकार्य राहील अशी ग्वाही डॉक्टर पाटील व पदाधिकाऱ्यांनी दिली.डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू. विद्यापीठाला नवी उंची मिळवून देण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही दिली.

यावेळी पारंपरिक विद्यापीठांचे प्रश्न समस्या यावर चर्चा झाली. विद्यापीठाचे नाव भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक उंचावण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची भूमिका यावेळी पदाधिकाऱ्यांनी मांडली.

यावेळी कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे, आघाडीचे उपाध्यक्ष भैय्या माने, डॉ.प्रताप पाटील, डॉ.डी.आर.मोरे, के. एस. चोगले, कौस्तुभ गावडे, डॉ.मेघा गुळवणी, डॉ.मंजिरी मोरे, ॲड. अभिजित कापसे, डॉ. एस. एस. घाळी, डॉ.आर.वाय. पाटील, प्रा. अनिल कुराडे, संजय जाधव, विनोद पंडित, डॉ. दत्ता पाटील, उपस्थित होते.

10 JUN 2026

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ प्रगतीसाठी विकास आघाडीचे सहकार्य

## डॉ. संजय डी. पाटील यांची ग्वाही

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विकासात्मक उपक्रमांना आघाडीतर्फे सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.

डॉ. संजय पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन कुलगुरू व प्र-कुलगुरूंचा सत्कार केला. विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी विकास आघाडीचे नेहमीच पाठबळ राहील, असेही त्यांनी नमूद केले.

कुलगुरू डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका मांडली. विद्यापीठाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक उंचीवर नेण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत विद्यापीठासमोरील विविध प्रश्न व आव्हानांवर चर्चा झाली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विकास आघाडीचे उपाध्यक्ष भैया माने, डॉ. प्रताप पाटील, डॉ. डी. आर. मोरे, के. एस. चौगले, कौस्तुभ गावडे, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. मंजिरी मोरे, अॅड. अभिजित कापसे, डॉ. एस. एस. घाळी, डॉ. आर. वाय. पाटील, प्रा. अनिल कुराडे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे स्वागत करताना विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील. समवेत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व आघाडीचे अन्य पदाधिकारी. (छाया : नाज ट्रेनर)**

10 JUN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीसाठी विकास आघाडीचे पाठबळ

## डॉ. संजय डी. पाटील यांची ग्वाही : कुलगुरू, प्र-कुलगुरूंचे स्वागत



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे स्वागत करताना विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह आघाडीतील अन्य पदाधिकारी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विकासात्मक उपक्रमांना आणि सर्वांगीण प्रगतीसाठी आघाडीतर्फे सहकार्य व पाठबळ देऊ, अशी ग्वाही आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.

अध्यक्ष डॉ. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. कामत आणि डॉ. जाधव यांचे स्वागत केले. विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे. यासाठी कआमचे नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही डॉ. पाटील आणि पदाधिकाऱ्यांनी दिली. डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू. विद्यापीठाला नवी उंची मिळवून देण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी पारंपरिक विद्यापीठांचे प्रश्न, समस्या यावर चर्चा झाली.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आघाडीचे उपाध्यक्ष भैया माने, डॉ. प्रताप पाटील, डॉ. डी. आर. मोरे, के. एस. चौगले, कौस्तुभ गावडे, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. मंजिरी मोरे, ॲड. अभिजित कापसे, डॉ. एस. एस. घाळी, डॉ. आर. वाय. पाटील, प्रा. अनिल कुराडे, संजय जाधव, विनोद पंडित, डॉ. दत्ता पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
तरुण भारत



कोल्हापूर : रवळनाथ सोसायटीच्या कार्यक्रमप्रसंगी उपस्थितीत कुलगुरू डॉ. आर. के. कामत, अविनाश जोशी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, एम. एल. चौगुले, डॉ. आर. एस. निळपणकर, डी. के. मायदेव आदी.

# आर्थिक तंदुरूस्तीसाठी रवळनाथ सोसायटीसारखी संस्था सोबत हवी

■ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे गौरवोद्गार

■ कोल्हापूर शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त आनंद सोहळा

**त. भा. प्रतिनिधी**

**गडहिंग्लज :** शारीरिक आणि मानसिक आरोग्य जसे उत्तम हवे तसेच आपले आर्थिक जीवन तंदुरुस्त राखणे हे देखील काळाची गरज आहे. त्यासाठी आपल्याला आर्थिक मार्गदर्शन करण्यासाठी रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीसारखी आर्थिक संस्था आपल्या सोबत पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

रवळनाथ हौसिग सोसायटीच्या कोल्हापूर शाखेचा १४ वा वर्धापन दिन आणि १०० कोटी ठेव संकल्पपूर्तीनिमित्त शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित आनंद सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. यावेळी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी रवळनाथ सोसायटीच्या कार्याचा गौरव केला. विविध क्षेत्रातील लोकांच्या मार्गदर्शनातून उभी राहिलेली ही संस्था आज सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह बनली आहे. अध्यक्ष चौगुले यांनी तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या हस्ते सुरू केलेल्या या शाखेने विद्यापीठातील कुलगुरू, अधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी स्नेहसंबंध प्रस्थापित केले. शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर शाखेची प्रगती होताना दिसते आहे.

यावेळी अविनाश जोशी यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्रा. आर. एस. पाटील, शाखा चेअरमन विजय हारगुडे, डॉ. सतीश घाळी, डॉ. ए. एम. गुरव, उमेश मिसाळ, अमृत सुतार, भास्कर सांगावकर, पंकजराजे यांचा सत्कार करण्यात आला. शाखा अधिकारी सचिन चौगुले यांनी स्वागत, विजय हारगुडे यांनी परिचय, चेअरमन डॉ. आर. एस. निळपणकर यांनी प्रास्ताविक तर सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले. कुलसचिव व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026

पुण्यनगरी



# वैष्णवीची आंतरराष्ट्रीय स्पर्धसाठी निवड

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेली शिवाजी विद्यापीठाची खेळाडू वैष्णवी राजेंद्र रावळ हिचा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, डॉ. राहुल मगदूम आदी उपस्थित होते. दि. ९ ते १२ जुलै २०२६ दरम्यान चीनमध्ये होणाऱ्या २३ वर्षाखालील ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये वैष्णवी (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) हिची भारतीय संघात निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
लोकमत

# विद्यापीठात बापूजी साळुंखे यांची जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभाग परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर, शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभाग परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर, शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, गणित अधिविभाग प्रमुख डॉ. मच्छिंद्र गोफणे, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
सकाळ

# डॉ. बापूजी साळुंखे यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी झाली. शिक्षणशास्त्र अधिविभाग परिसरातील डॉ. साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. अजय साळी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर, शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ३३३६ विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026

पुढारी

# एमसीए, एमबीए, एम फार्मसी, बी फार्मसी परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील एमसीए, एमबीए, एम फार्मसी, बी फार्मसी, फार्मा डी आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३६ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. सध्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. मंगळवारी झालेल्या परीक्षेला ३ हजार ३३६ विद्यार्थी उपस्थित होते. मंगळवारी (दि. ९) बीबीए, एमबीए, एमएस्सी (अप्लाईड केमेस्ट्री), बीबीए, एमबीए, बीए बी लिब, एलएलबी आदी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2026
तरुण भारत



# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल-२०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा अत्यंत नियोजनबद्ध आणि व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३८ परीक्षा केंद्रांवर कोणतीही अडचण न येता सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांमध्ये प्रामुख्याने एम.सी.ए., एम.टेक्. बी. टेक्., एम. बी. ए., बीबीए / एमबीए इंटिग्रेटेड प्रोग्राम, फार्मा डी आणि बी. फार्मसी या अभ्यासक्रमांचा समावेश होता. या सर्व परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात आल्या असून, यासाठी एकूण ९,१४४ विद्यार्थी उपस्थित होते. १ एप्रिल २०२६ पासून या उन्हाळी सत्राच्या परीक्षा सुरू आहेत. परीक्षा सुरू असतानाच विद्यापीठाने निकाल गतीने लावण्यावर भर दिला आहे. आज जाहीर झालेल्या निकालांसह विद्यापीठाने या सत्रातील तब्बल ६४६ अभ्यासक्रमांचे निकाल आतापर्यंत घोषित केले आहेत.

10 JUN 2026

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# जिद्द असेल तर..!

**प्रत्येकाच्या आयुष्यात संकटे येतात. आपल्यासमोर आलेली संकटे प्रत्येकाला हिमालयाएवढी मोठी वाटतात. मात्र प्रत्यक्षात अनेकांच्या समोर येणारी संकटे ही फारच छोटी असतात. आपण थोरामोठ्यांची चरित्रे जेव्हा पहायला जातो तेव्हा त्यांनी पाहिलेले स्वप्न आणि ते साकार करण्यासाठी घेतलेले कष्ट आपल्याला प्रेरणा देतात. आपली संकटे छोटी वाटू लागतात. मोठमोठ्या संकटावर मात करणारेच अजरामर होतात. एका मुलाला शिकायचे होते, मात्र त्याचा शिकण्याचा मार्ग सोपा नव्हता. शालेय जीवनापासून अडथळ्यांची मालिका सुरू झाली, तरीही ते शिकले. अनेक वर्षे स्वत:च शिकून पुढे विद्यापीठात प्राध्यापक झाले. नोबेल पुरस्काराचे मानकरी ठरले. केवळ दुर्दम्य इच्छाशक्ती आणि प्रामाणिक प्रयत्नाच्या जोरावर आयुष्यात यशस्वी झालेले संशोधक म्हणजे विल्यम रॉन्टजेन.**

जर्मनीच्या एकीकरणापूर्वीच्या प्रशियातील लिनप या गावात विल्यम यांचा २७ मार्च १८४५ रोजी जन्म झाला. त्यांचे वडील कापडाचे व्यापारी होते, तर आई डच कुटुंबातील होती. त्यांच्यापोटी जन्मलेले हे एकमेव अपत्य. त्यांच्या जन्मानंतर काही वर्षांतच त्या भागात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्यांनी हॉलंडमध्ये स्थलांतर केले. परिणामी त्यांचे प्रशियन नागरिकत्व काढून घेण्यात आले. हॉलंडमध्ये रॉंटजेन यांचे आजोळ असल्याने हॉलंडने त्यांना तत्काळ नागरिकत्व दिले. विल्यम यांनी तेथील मार्टिन्स स्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर कुटुंबाच्या आग्रहावरून त्यांनी युट्रेच स्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यांची गिनिंग नावाच्या रसायनशास्त्रज्ञाच्या घरी राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यांच्यामुळे रॉंटजेन यांना विज्ञानाची आवड निर्माण झाली. रॉंटजेन यांना ते कायम विज्ञानातील अनेक किस्से सांगून प्रोत्साहन देत असत. त्याच काळात रॉंटजेन यांच्या शैक्षणिक वाटचालीत पहिला अडथळा आला. त्यांची शाळा झोपडपट्टीजवळ होती. वर्गात सर्व स्तरातील मुले होती. त्यामध्ये जवळच्या झोपडपट्टीतील मुलेही होती. त्यांची शाळेत दादागिरी सुरू असायची. ते सर्वच वर्गातील मुलांना धाकात ठेवायचे. वर्गात शिक्षकांची चित्रे काढत. मुलांची शिक्षकांची टवाळकी करत. कोणी विरोध केला तर त्याचा विरोध संपवण्यासाठी बेदम मारहाण करत. त्यामुळे कोणी त्यांच्याविरुद्ध काही बोलत नसत. अशा वातावरणात शिक्षण घेत असताना रॉंटजेन यांच्या वर्गातील त्या टारगट मुलांपैकी एका मुलाने पुढच्या तासाला येणाऱ्या शिक्षकाचे व्यंगचित्र फळ्यावर काढले. ते शिक्षक वर्गात येण्याच्या वेळी त्यांनी रॉंटजेन यांना फळ्याजवळून जाताना पाहिले. त्यांचा असा समज झाला की, हे व्यंगचित्र रॉंटजेन यांनी काढले आहे. त्यांनी विल्यम यांना शिक्षा द्यायचे ठरवले मात्र रॉंटजेन यांनी आपण चित्र काढले नसल्याचे सांगत शिक्षा स्वीकारण्यास नकार दिला.

लेख ऐकण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा.

त्यांना मुख्याध्यापकांकडे नेण्यात आले. तेथे त्यांची चौकशी करण्यात आली. रॉंटजेन यांनी तेथेही आपण चित्र काढले नसल्याचे सांगितले. यावर त्यांना कोणी काढले असे विचारण्यात आले. रॉंटजेन यांनी, 'आपण काढले नाही आणि कोणी काढले ते सांगू शकत नाही, असे सांगितले. यावर त्यांना, 'चित्र कोणी काढले ते सांग, नाहीतर तुला शाळेतून काढून टाकण्यात येईल', असे सांगितले. रॉंटजेन यांना माहीत होते की, त्यांनी जर नाव सांगितले तर शाळेबाहेर पडताच आपली धुलाई होणार. अखेर त्यांना दोषी मानून शाळेतून काढून टाकण्यात आले. शाळा बंद झाली पण रॉंटजेन यांच्या मनातील ज्ञानार्जनाची ओढ तीव्र झाली. शिक्षा झाल्याने शाळेतून काढून टाकल्याने अन्य शाळेत प्रवेश मिळणार नव्हता. अखेर त्यांनी शाळाबाह्य अभ्यास करायचे ठरवले.

त्यांनी युट्रेच विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठी शालाबाह्य विद्यार्थी म्हणून नाव नोंदवले. प्रवेश परीक्षेची तयारी जोरात केली. लेखी परीक्षेत त्यांना चांगले गुण मिळाले. त्यांचा प्रवेश निश्चित होता. विद्यापीठ प्रवेश परीक्षेत यशस्वी ठरलेल्या मुलांना कोणत्या विषयास प्रवेश द्यावा, हे निश्चित करण्यासाठी मुलाखत घेण्यात येत असे. रॉंटजेन मुलाखत देण्यासाठी युट्रेच विद्यापीठात गेले. येथे त्यांच्या मार्गातील दुसरा अडथळा आला. ज्या शिक्षकाचे व्यंगचित्र काढल्याच्या आरोपावरून त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले होते, तेच शिक्षक मुलाखत घेण्यासाठी समोर बसलेले होते. अर्थातच, रॉंटजेन यांना प्रवेश नाकारण्यात आला. आता त्यांना बाहेरून अभ्यास करण्याशिवाय अन्य कोणताच पर्याय उरलेला नव्हता. रॉंटजेन यांना कोणत्याही वर्गात प्रवेश मिळालेला नसला तरी त्यांनी विद्यापीठामध्ये शिकवल्या जाणाऱ्या काही विषयांचा अभ्यास सुरू केला.

त्याच काळात झुरीच येथे एक नवीन महाविद्यालय सुरू झाले. या महाविद्यालयात तंत्र पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला नसला तरी विज्ञान शाखेत प्रवेश देण्यात येत असे. त्यांनी वडिलांशी चर्चा करून या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे निश्चित केले. १६ नोव्हेंबर १८६५ ला ते झुरीचला गेले. त्यांना या ठिकाणी मात्र चांगले शिक्षण घेता आले. ते झुरीचला तीन वर्षे राहिले. ते फावल्या वेळात इतर विषयांच्या व्याख्यानालाही बसत. जसजसे ते शिकत होते, तसतशी त्यांची शैक्षणिक प्रगती सुधारत होती. अंतिम वर्षाच्या परीक्षेत तर ते वर्गात सर्वप्रथम आले. ऑगस्ट १८६८ मध्ये त्यांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला.

अभ्यासक्रम पूर्ण झाला तरी त्यांनी झुरीच काही सोडले नाही. ते प्रा. अगस्ट कुंड यांच्यासमवेत संशोधन करू लागले. कुंड यांच्यासमवेत त्यांनी वायूंचा अभ्यास करून एक वर्षातच डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. प्रा. कुंड यांनी रॉंटजेन यांच्यातील वैज्ञानिकाला जागे करण्याचे काम केले होते. रॉंटजेन यांनी त्यानंतरही प्रा. कुंड यांचा सहायक म्हणून संशोधन सुरू ठेवले. पुढे कुंडस यांना वुझबर्ग येथील विद्यापीठात बोलविण्यात आले. तेथे जाताना कुंड यांनी रॉंटजेन यांनाही तेथे पद द्यावयास लावले. मात्र तेथे संशोधनापेक्षा अध्यापनावरच जास्त भर दिला जाई. अखेर दोघेही कैसर विल्हेम विद्यापीठात गेले. दरम्यान त्यांना ॲग्रिकल्चर कॉलेज, स्टुगर्ट येथे अध्यापकाची नोकरी मिळाली. ते तेथे गेले मात्र वर्षभरातच कुंड यांनी त्यांना परत बोलावून घेतले. त्यांच्यावर नव्या विभागाची जबाबदारी देण्यात आली. प्रा. कुंड यांच्यासमवेत काम करताना त्यांच्यातील संशोधकवृत्ती पूर्ण विकसित झाली होती. दरम्यान जगभर कॅथोड किरणांनी सर्व संशोधकांचे लक्ष वेधून घेतले होते. रॉंटजेन यांनीही याच विषयावर संशोधन सुरू केले आणि त्यांना क्ष-किरण किंवा एक्स-रेचा शोध लागला. त्यावेळी हे किरण कोणालाच माहीत नसल्याने त्यांचे बारसे क्ष-किरण असे करण्यात आले आणि याच क्ष-किरणांच्या शोधाने त्यांना भौतिकशास्त्रातील पहिल्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. न केलेल्या चुकीसाठी शाळेतून काढून टाकलेल्या मुलगा ज्ञानलालसेतून अजरामर झाला.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००